**दिः 02 मार्च,2014**

# लखनौमध्ये मोदी

**-अरुण जेटली**

विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

लखनौमध्ये नरेंद्र मोदी यांच्या रॅलीला खुप मोठे समर्थन मिळाले. दिल्लीचा रस्ता उत्तरप्रदेश होऊन जातो. हा देशाचा सर्वात मोठा राज्य आहे, जिथून लोकसभेसाठी ऐंशी सदस्य येतात. 1990 च्या दशकात जेव्हा भाजपाने मजबूत स्थितीतून उभारी घेतली होती, उत्तरप्रदेशाची तेव्हा महत्त्वपूर्ण भुमिका होती. 1991 च्या सामान्य निवडणुकांमध्ये भाजपाला अविभाजित उत्तरप्रदेशातून 85 मधून 52 जागा मिळाल्या होत्या. 1996 मध्ये ही संख्या वाढून 58(+2 सहयोगींसाठी) 1988 मध्ये 50 झाली. यानंतर भाजपाची ताकद सतत कमी होत गेली. भाजपाला 1999 मध्ये 29 जागा मिळाल्या. 2004 आणि 2009 मध्ये त्याला फक्त 10 जागा मिळाल्या. जर भाजपाला दिल्लीत सरकार बनवायची असेल तर भाजपाला 1990 च्या आकड्यापर्यंत पोहचावे लागेल. काय हे शक्य होईल?

उत्तरप्रदेशात निवडणुकीचा सामना मुख्य करुन भाजपा, समाजवादी पक्ष आणि बसपा दरम्यान आहे. 2009 मध्ये कॉंग्रेसने आश्चर्यजनक 22 जागांवर विजय मिळविला होता. वर्तमान संकेत मिळत आहेत की ती अधिकारहीन होईल. आम आदमी पक्ष बातमी बनविण्याच्या प्रयत्नात आहे. आणि लोकांचे लक्ष वेधून घेण्यात मग्न आहे. मात्र याचा उत्तरप्रदेशच्या मतदारांवर काही खास परिणाम होईल असे वाटत नाही.

बसपा आणि सपा यांच्या शासनाची मागील कार्य शंकास्पद राहीले. समाजवादी पक्षाचे शासन दुर्भाग्यपूर्ण आहे. जेव्हापासून ते सत्तेत आहेत उत्तरप्रदेशात कायदा आणि सुव्यवस्था ढासळली आहे. सामाजिक आणि सांप्रदायिक तणाव वाढला आहे. उत्तर प्रदेशमध्ये असंख्य सांप्रदायिक दंगली झाल्या आहेत. बसपाचे मागील शासन जबरदस्त वसूली वाला राहिला. त्यांनी निरंकूश शासन केले. हे दोन्ही पक्ष मागील 10 वर्षापासून युपिएला सत्तेत ठेवण्यासाठी जबाबदार आहेत. युपिएला समर्थन देण्याची रणनिती अदला-बदलीची आहे. आदान-प्रदान ची व्यवस्था सीबीआयला सहजरित्या आपल्या वश मध्ये करण्यासाठी केली आहे कारण या दोन्ही पक्षाच्या नेत्यांच्या विरोधात भ्रष्टाचाराचे प्रकरण प्रलंबित आहेत.

उत्तरप्रदेशाच्या जनतेचे मूड बदलत असल्याचे दिसते. जातीगत ध्रुवीकरणाचा मुद्दा मागे गेल्याचे दिसते. सामाजिक ध्रुवीकरणाचा प्रभाव काही मर्यादेत कमी झाला आहे, तथापि पूर्णपणे समाप्त झालेला नाही. ज्या आठ रॅलींना नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले त्यात लोकांची अलोट गर्दी दिसून आली. उत्तर प्रदेशात आज प्रमुख मुद्दा शासनाचा आहे. उत्तर प्रदेशात आकांक्षापूर्ण राजकारण स्पष्ट दिसून येते. उत्तर प्रदेशातील राजकारणात पूर्णपणे बदल झाला आहे. जेव्हा मोदी यांनी प्रसून जोशी यांच्या एका कवितेने भाषण समाप्त केले मला 1977 मधील सामान्य निवडणुकांतील भाषणे आठवू लागली, ज्यात वक्ते दिनकरजी यांच्या प्रसिद्ध पंक्तिंनी आपले भाषण समाप्त करत असत, “सिंहासन खाली करा जनता येत आहे.”